मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अखेर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर

## 246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर; निवडणूक आयोगाची घोषणा

**पिंपरी | प्रतिनीधी**

गेल्या अनेक महिन्यांपासून ज्या निवडणूक कार्यक्रमाची प्रतीक्षा महाराष्ट्रभरातील मतदारांना लागून राहिली होती, तो कार्यक्रम अखेर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. त्यानुसार पहिल्या टप्प्यात राज्यभरात नगरपरिषद व नगरपंचायतीसाठी निवडणूक होईल तर दुसऱ्या टप्प्यात जिल्हापरिषद व महानगर पालिकांसाठीच्या कार्यक्रमाची घोषणा केली जाईल.

राज्य निवडणूक आयोगाने आज जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, २ डिसेंबर रोजी महाराष्ट्रभरात नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी केली जाईल. १० डिसेंबर रोजी या निवडणुकांचे निकाल जाहीर केले जातील. कोणत्या नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी निवडणुका होणार याची सविस्तर जिल्हानिहाय यादीदेखील निवडणूक आयोगाकडून देण्यात आली आहे.

### नगरपंचायत व नगरपरिषद निवडणूक आकडेवारी...

राज्यातील २४६ नगर परिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेतल्या जाणार आहेत. यामधून ६,८४९ सदस्यांची व २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे. यंदा १० नव्या नगर परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. तर, २३६ नगर परिषदांची मुदत संपली आहे. तसेच राज्यातील ४७ पैकी पाच नगर पंचायतींची मुदत अद्याप संपलेली नाही. तर उर्वरित ४२ नगरपंचायतींची निवडणूक होणार आहे. यापैकी २७ नगर पंतायतींची मुदत संपली असून १५ नव्या नगरपंचायतींची यंदा भर पडली आहे.

### जिल्हानिहाय नगरपरिषदा व नगरपंचायतींची यादी



पालघर- डहाणू, जव्हार, पालघर आणि वाडा (न.पं)

रायगड- अलिबाग, कर्जत, खोपोली, महाड, माथेरान, मुरुड-जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन आणि उरण (न.प.). रत्नागिरी- चिपळूण, देवरुख (न.पं.), गुहागर, खेड, लांजा (न.पं.), राजापूर आणि रत्नागिरी.

सिंधुदुर्ग- कणकवली (न.पं.), मालवण, सावंतवाडी आणि वेंगुर्ला.

ठाणे- अंबरनाथ आणि कुळगाव-बदलापूर.

अहिल्यानगर- देवळाली- प्रवरा, जामखेड, कोपरगाव, नेवासा (न.पं.) (न.पं.), पाथर्डी, राहाता, राहूरी, संगमनेर, शेवगाव, शिर्डी, श्रीगोंदा आणि श्रीरामपूर.

धुळे- दोंडाईचा-वरवाडे, पिंपळनेर, सिंदखेडा (न.पं.) आणि शिरपूर- वरवाडे.

जळगाव- जामनेर, अमळनेर, भडगाव, भुसावळ, चाळीसगाव, चोपडा, धरणगांव, एरंडोल, फैजपूर, मुक्ताईनगर (न.पं.), नशिराबाद, पाचोरा, पारोळा, रावेर, सावदा, शेंदूणी (न.पं.), वरणगाव आणि यावल.

नंदूरबार- शहादा, नंदुरबार, नवापूर आणि तळोदा.

नाशिक- भगुर, मनमाड, नांदगाव, सटाणा, सिन्नर, येवला, चांदवाड, इगतपूरी, ओझर, पिंपळगांव- बसवंत आणि त्र्यंबक.

कोल्हापूर- आजरा (न.पं.), चंदगड (न.पं.), गडहिंग्लज, हातकणंगले, हुपरी, जयसिंगपूर, कागल, कुरुंदवाड, मलकापूर, मुरगूड, पन्हाळा, शिरोळ आणि वडगाव.

पुणे- आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी- उरळी देवाची, इंदापूर, जेजूरी, जुन्नर, लोणावळा, मालेगाव बु. (न.पं.), मंचर (न.पं.), राजगुरुनगर, सासवड, शिरुर, तळेगाव- दाभाडे आणि वडगाव (न.पं.).

सांगली- आष्टा, आटपाडी (न.पं.), इस्लामपूर, जत, पळूस, शिराळा (न.पं.), तासगाव आणि विटा.

सातारा- कराड, महाबळेश्वर, मलकापूर, मेढा (न.पं.), म्हसवड, पाचगणी, फलटण, रहिमतपूर, सातारा आणि वाई.

सोलापूर- अक्कलकोट, अकलूज, अनागर (न.पं.), बार्शी, दुधनी, करमाळा, कुर्डूवाडी, मैदर्गी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर आणि सांगोला.

बीड- अंबेजोगाई, बीड, धारुर, गेवराई, माजलगाव आणि परळी-वैजनाथ.

छत्रपती संभाजीनगर- फुलब्री (न.पं.), गंगापूर, कन्नड, खुलताबाद, पैठण, सिल्लोड आणि वैजापूर.

धाराशिव- भूम, कळंब, मुरुम, नळदुर्ग, धाराशिव, परंडा, तुळजापूर आणि उमरगा.

हिंगोली- बसमतनगर, हिंगोली आणि कळमनुरी. जालना- अंबड, भोकरदन आणि परतूर.

लातूर- अहमदपूर, औसा, निलंगा, रेनापूर (न.पं.) आणि उदगीर.

नांदेड- बिलोली, देगलूर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर (न.पं.), कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, मुखेड, उमरी, भोकर, किनवट आणि लोहा.

परभणी- गंगाखेड, जिंतूर, मानवत, पाथरी, पूर्णा, सेलू आणि सोनपेठ.

अकोला- अकोट, बाळापूर, बार्शी- टाकळी, हिवरखेडा, मूर्तिजापूर आणि तेल्हारा.

अमरावती- अचलपूर, अंजनगाव सूर्जी, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, चिखलदरा, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, धारणी (न.पं.), मोर्शी, नांदगाव खंडेश्वर (न.पं.), शेंदूरजनाघाट आणि वरुड.

बुलढाणा- बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा, जळगाव जामोद, खामगाव, लोणार, मलकापूर, मेहकर, नांदूरा, शेंगाव आणि सिंदखेडराजा.

वाशीम- कारंजा, मालेगाव (न.पं.), मंगरुळपीर, रिसोड आणि वशीम.

यवतमाळ- आर्णी, दारव्हा, दिग्रस, घाटंजी, पुसद, उमरखेड, वणी, यवतमाळ, ढाणकी (न.पं.), नेर- नबाबपूर आणि पांढरकवडा.

भंडारा- पवनी, साकोली शेंदूरवाफा, तुमसर आणि भंडारा.

चंद्रपूर- बल्लारपूर, भद्रावती, भिसी (न.पं.), ब्रह्मपूरी, चिमूर, गडचांदूर, घुग्घुस, मूल, नागभीड, राजूरा आणि वरोरा.

गडचिरोली- आरमोरी, देसाईगंज आणि गडचिरोली.

गोंदिया- गोंदिया, गोरेगाव (न.पं.), सालेकसा (न.पं.) आणि तिरोडा.

नागपूर- बहादुरा (न.पं.), बेसा पिपळा (न.पं.), भिवापूर (न.पं.), बुटिबोरी, डिगडोह, कळमेश्वर-ब्रह्मणी, कामठी, कांद्री- कन्हान (न.पं.), काटोल, खापा, कोंढाळी (न.पं.), महादुला (न.पं.), मोहपा, मौदा (न.पं.), नरखेड, निलडोह (न.पं.), पारशिवणी (न.पं.), रामटेक, सावनेर, उमरेड, वानाडोंगरी, बिडगाव- तरोडी (खू) पांढुर्णा (न.पं.), गोधणी रेल्वे (न.पं.), कन्हान- पिपरी, मोवाड, वाडी आणि येरखेडा (न.पं.).

वर्धा- आर्वी, देवळी, हिंगणघाट, पुलगाव, सिंदी रेल्वे आणि वर्धा.

### असा असेल निवडणूक कार्यक्रम..

- अर्ज दाखल करण्यास सुरुवात – १० नोव्हेंबर २०२५
- अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत – १७ नोव्हेंबर २०२५
- अर्जांची छाननी – १८ नोव्हेंबर २०२५
- अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत – २१ नोव्हेंबर २०२५
- आक्षेप असलेल्या ठिकाणी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत – २५ नोव्हेंबर २०२५
- निवडणूक चिन्ह व उमेदवारांची अंतिम यादी – २६ नोव्हेंबर २०२५
- मतदान – २ डिसेंबर २०२५
- मतमोजणी – ३ डिसेंबर २०२५
- निकाल जाहीर करण्याचा दिवस – १० डिसेंबर २०२५

### एकूण जागा आणि आरक्षित जागा..

- निवडणूक होत असलेल्या नगरपरिषदा- २४६
- निवडणूक होत असलेल्या नगरपंचायती- ४२
- एकूण प्रभाग- ३८२०
- एकूण जागा- ६८५९
- महिलांसाठी जागा- ३४९२
- अनुसूचित जातींसाठी जागा- ८९५
- अनुसूचित जमातींसाठी जागा- ३३८
- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा- १८२१

### एकूण मतदार व मतदान केंद्र

- पुरुष मतदार- ५३ लाख ७९ हजार ९३१
- महिला मतदार- ५३ लाख २२ हजार ८७०
- इतर मतदार- ७७५
- एकूण मतदार- १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६
- एकूण मतदान केंद्र- सुमारे १३ हजार ३५५

### एकूण मतदार व मतदान केंद्र

- पुरुष मतदार- ५३ लाख ७९ हजार ९३१
- महिला मतदार- ५३ लाख २२ हजार ८७०
- इतर मतदार- ७७५
- एकूण मतदार- १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६
- एकूण मतदान केंद्र- सुमारे १३ हजार ३५५

# पीएमआरडीएत 163 गावे समाविष्ट होणार

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात लवकरच मोठ्या प्रमाणावर विस्तार होणार




**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात लवकरच मोठ्या प्रमाणावर विस्तार होणार असून, या विस्तारामुळे प्राधिकरणाची हद्द जवळपास संपूर्ण पुणे जिल्हा व्यापणार आहे. सध्या पीएमआरडीएच्या हद्दीत ६९७ गावे आहेत, परंतु आता १६३ नवीन गावे त्यात समाविष्ट करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या विस्तारामुळे पीएमआरडीएच्या अखत्यारीतील गावांची एकूण संख्या सुमारे ९०० होणार आहे.

या विस्तारानंतर पीएमआरडीएसमोर प्रशासकीय जबाबदारी वाढणार असली, तरी विकास आराखडा तयार करणे, बांधकाम परवानग्या देणे, रस्ते व पायाभूत सुविधा उभारणे यांसारख्या प्रक्रियांना अधिक एकसंध आणि सुसंगत दिशा मिळेल. आतापर्यंत अनेक गावांचा विकास पुणे आणि पीएमआरडीएच्या सीमेवर अडकलेला होता, परंतु नव्या समावेशनामुळे नियोजनबद्ध वाढ शक्य होईल. प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, "हा विस्तार केवळ भौगोलिक नसून, विकासाच्या दृष्टीने दीर्घकालीन विचार करून करण्यात येत आहे. पुणे महानगर क्षेत्र झपाट्याने वाढत आहे आणि या वाढीला योग्य दिशा देण्यासाठी पीएमआरडीएचा विस्तार अपरिहार्य आहे.

**संपूर्ण तालुके पीएमआरडीएत**

या नव्या प्रस्तावानुसार, बारामती तालुक्यातील ११३ महसुली गावे आणि पुरंदर तालुक्यातील सुमारे ५० गावे पूर्णपणे पीएमआरडीएच्या हद्दीत आणण्याचे नियोजन आहे. त्यामुळे हे दोन्ही तालुके प्राधिकरणाच्या अखत्यारीत पूर्णपणे येणार आहेत. या दोन तालुक्यांमध्ये औद्योगिक व कृषी दोन्ही प्रकारची वस्ती असल्याने, पुढील काळात या भागांचा विकास नियोजनाच्या दृष्टीने मोठा फायदा होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

संभाव्य फायदे

विकास आराखड्यात ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांचा समावेश

एकसंध पायाभूत सुविधा नियोजन (रस्ते, जलपुरवठा, मलनिस्सारण)

बांधकाम व औद्योगिक गुंतवणुकीसाठी स्पष्ट नियमावली

कृषी व पर्यटन क्षेत्रात नियोजित विकासाला चालना

### पुढील पाऊल..

» शासनाच्या मंजुरीनंतर नव्या गावांचा अधिकृत अधिसूचना प्रकाशित केली जाईल. त्यानंतर पीएमआरडीए या गावांच्या जमिनींच्या नकाशांचा सर्वेक्षण, लोकसंख्या आकडेवारी, तसेच विकास आराखडा दुरुस्ती प्रक्रिया सुरू करणार आहे. अधिकाऱ्यांच्या मते, "पुढील काही वर्षांत पुणे जिल्हा हा भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या महानगरांपैकी एक होईल. त्यामुळे वेळेवर केलेला हा विस्तार भावी नियोजनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

### शासननिर्णयाच्या प्रतीक्षेत प्रस्ताव..

» या विस्ताराच्या प्रस्तावाला राज्य शासनाची मंजुरी अद्याप प्रलंबित आहे. शासकीय यंत्रणेतर्फे आवश्यक सर्व अहवाल व नकाशे तयार करून शहरी विकास विभागाकडे सादर करण्यात आले आहेत. अधिकृत मंजुरी मिळताच या नव्या गावांचा समावेश औपचारिकरीत्या करण्यात येईल. पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात सध्या पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रांसह मावळ, मुळशी, हवेली, भोर, शिरूर, दौंड, खेड, वेल्हे आणि पुरंदर तालुक्यांतील काही गावे आहेत.

“ पीएमआरडीए हद्दीत नव्याने काही गावांची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. त्या प्रस्तावावर अद्याप निर्णय झाला नाही. त्यावर प्रशासकीय कार्यवाही सुरू होईल.

**– डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.**

# पिंपरी-चिंचवड शहरात उभारले जाणार 22 इव्ही चार्जिंग स्टेशन

## महापालिकेचा शून्य खर्च; खासगी संस्थेला काम देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात वाढत्या इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराचा विचार करून २२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. मागील तीन वर्षांत चार वेळा निविदा काढूनही प्रतिसाद न मिळाल्यानंतर, अखेर एका खासगी संस्थेला हे काम देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

"बिल्ड, ऑपरेट अँड मेंटेन (BOM)" या तत्त्वावर ही केंद्रे उभारली जाणार असून, महापालिकेला यासाठी कोणताही खर्च करावा लागणार नाही. महापालिका जागा उपलब्ध करून देईल, तर संबंधित संस्था स्वतःच्या निधीतून स्टेशन उभारून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेईल आणि पुढील दहा वर्षे त्याचे संचालन व देखभाल करेल.

शहरात सध्या २३ लाखांहून अधिक वाहने नोंदणीकृत असून, त्यापैकी ५० हजारांहून अधिक इलेक्ट्रिक वाहने आहेत. त्यामुळे या उपक्रमामुळे वाहनचालकांना मोठी सुविधा मिळणार आहे. प्रत्येक स्टेशनसाठी सुमारे ६९ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, २२ केंद्रांसाठी अंदाजे २० कोटी रुपयांचा प्रकल्प तयार करण्यात आला आहे.

“ लेखा विभागाच्या मंजुरीनंतर स्थायी समितीकडून मान्यता घेऊन सहा महिन्यांत चार्जिंग केंद्रे उभारली जातील.

**– अनिल भालसाकळे, सहशहर अभियंता, महापालिका.**

### या 22 ठिकाणी होणार चार्जिंग स्टेशन्स..

» महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीचे प्रांगण, जुना पुणे-मुंबई महामार्ग, दुर्गादेवी टेकडी, वाहतूकनगरी (निगडी), बर्ड व्हॅली संभाजीनगर, बजाज ऑटो, कुस्ती संकुल भोसरी, मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडिअम नेहरूनगर, चिखली, मलनिस्सारण केंद्र चिखली, संतनगर उद्यान कासारवाडी, कोकणे चौक, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, लांडेवाडी भोसरी, 'भक्ती-शक्ती निगडी, संत तुकारामनगर मेट्रो स्थानक, पी. के. चौक, योगा पार्क-पिंपळे सौदागर, राजमाता जिजामाता उद्यान-पिंपळे गुरव, वल्लभनगर, ऑटो क्लस्टर आणि राजर्षी शाहू उद्यान.

# मानव-बिबट्या संघर्षावर सरकारचे निर्णायक पाऊल!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने 11 कोटी 25 लाख रुपयांचा निधी मंजूर

**पुणे | प्रतिनिधी**

मागील काही वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यांमध्ये मानव-बिबट्या संघर्षाची परिस्थिती गंभीर बनली आहे. बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे आणि मानवी वस्त्यांमध्ये त्यांच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील पाच वर्षांत झालेल्या हल्ल्यांमध्ये अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. नुकत्याच झालेल्या हल्ल्यांत एका १३ वर्षीय चिमुरड्याचा, तसेच एका वृद्ध महिलेसह लहान मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.



या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी तातडीची दखल घेत बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी आणि मानव-बिबट संघर्षावर नियंत्रण आणण्यासाठी तब्बल ११ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मनुष्यहानी रोखण्याला सर्वोच्च प्राधान्य असून नागरिकांनी घाबरुन जाऊ नये असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

पुणे जिल्ह्यातील उत्तरेकडील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरुर या तालुक्यात ऊसाचे क्षेत्र, पाण्याच्या मुबलकतेसह अनुकुल वातावरणामुळे गेल्या काही वर्षात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे या भागात बिबट्या आणि नागरिकांच्यात सातत्याने संघर्ष होत आहे. याला पायबंद घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी आंबेगावचे स्थानिक आमदार, माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ११ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या मंजूर निधीतून जुन्नर वनविभागाच्या कार्यक्षेत्रात २० विशेष रेस्क्यू टीम कार्यरत होणार असून प्रत्येक टीममध्ये प्रशिक्षित नेमबाज, शोधक, ट्रँक्युलायझिंग गन, रेस्क्यू वाहने, अत्याधुनिक कॅमेरे, पिंजऱ्यांसह आवश्यक उपकरणांचा समावेश असेल.

या मोहिमेत ५०० पिंजरे, २० ट्रँक्युलायझिंग गन, ५०० ट्रॅप कॅमेरे, २५० लाईव्ह कॅमेरे, ५०० हाय-पॉवर टॉर्च, ५०० स्मार्ट स्टिक, २० मेडिकल इक्विपमेंट किट्स यांसह प्रत्येक टीमसाठी ५-६ प्रशिक्षित सदस्य असणार आहेत. जुन्नर वनविभागात ६११.२२ चौ.कि.मी. क्षेत्र आहे ज्यात जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर या चार तालुक्यांचा समावेश आहे. घोड, कुकडी, माणिकडोह, पिंपळगाव जोगा यांसारख्या सिंचन प्रकल्पांमुळे या भागात ऊस, केळी, द्राक्ष, डाळिंब यांसारखी दिर्घकालीन बागायती पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. या बागायती पिकांमुळे बिबट्यांना लपण्यासाठी निवारा, पाणी आणि भक्ष्य सहज उपलब्ध होते. परिणामी या भागात बिबट्यांचा स्थायिक अधिवास निर्माण झाला असून अंदाजे १५०० बिबट्यांचे अस्तित्व असल्याचे वनविभागाचे निरीक्षण आहे.

या निधीसाठी आंबेगावचे आमदार तथा माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ११ कोटी २५ लाख रुपयांचा निधी तातडीने मंजूर केला. यापूर्वीही जिल्हा नियोजन मंडळामार्फत २ कोटी रुपयांचा निधी पिंजरे खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातून पिंजरे खरेदीचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

### मनुष्यहानी रोखणे हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य

» या ठोस उपाययोजनांमुळे बिबट्यांना मानवी वस्त्यांपासून सुरक्षित अंतरावर ठेवणे, त्यांना योग्य ठिकाणी स्थलांतरित करणे आणि मनुष्यहानीचे प्रमाण कमी करणे शक्य होईल. मानव-बिबट संघर्षामुळे सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी आणि वन्यजीवांचे संरक्षण करताना मानवी जीविताचे रक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. या निधीतून रेस्क्यू टीम, पिंजरे आणि तांत्रिक साधनसामग्री उपलब्ध करून दिली जाणार आहे. कारवाई तातडीने सुरू होईल, मनुष्यहानी रोखण्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे.

# पुणे महापालिकेतर्फे आता 'खड्डेमुक्त पुणे अभियान' ॲप

## पुणे शहरातील रस्त्यांना पडलेले खड्डे बुजविण्यासाठी महापालिकेने आणले ॲप

**पुणे | प्रतिनीधी**

शहरातील रस्त्यांना पडलेले खड्डे बुजविण्यासाठी महापालिकेने ॲप आणले, अभियंत्यांना कडक शब्दात आदेश दिले तरीही खड्डे कायम आहेत. त्यानंतर आता रस्त्यांवरील खड्डे शोधून ते बुजविण्यासाठी पथ विभागाने क्षेत्रीय कार्यालयांमधील अभियंत्यांची विशेष पथके तयार केले आहे.




ही पथके आता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून खड्डयांचा शोध घेऊन ते बुजविणार आहे. या 'खड्डेमुक्त पुणे अभियानाचा' प्रारंभ सोमवारी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते पार पडला. या वेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पथ विभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर आदी अधिकारी उपस्थित होते.

गेल्या काही महिन्यांत पोलिसांच्या सीसीटीव्ही केबल टाकण्यासाठी शहरातील मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर खोदाई करण्यात आली होती. या कामांनंतर रस्त्यांचे व पदपथांचे पुनर्वसन न झाल्याने अनेक रस्ते अत्यंत खराब स्थितीत आले आहेत. धोकादायक खड्डे, उखडलेले पदपथ आणि वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या रस्त्यांमुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता.

त्यामुळे अभियंत्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून खड्डे बुजविणे आवश्यक आहे. त्यासाठी खड्डेमुक्त पुणे करण्याचा संकल्प प्रशासनाने केला आहे. या अभियानाचा शुभारंभ सारसबाग येथील सणस मैदानासमोरील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाच्या प्रवेशद्वाराजवळील खराब रस्त्याची दुरुस्ती करून करण्यात आला. येथे जुन्या रस्त्याचे मिलिंग करून नव्याने डांबर टाकून खड्डे बुजविण्यात आले. यानंतर शहरातील विविध भागांमध्ये ही मोहीम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे.

पथ विभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर म्हणाले, 'पहिल्या टप्प्यात हे अभियान शहराच्या जुन्या हद्दीत राबविण्यात येईल. यासाठी पथ विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांच्या अभियंत्यांची पथके तयार केली आहेत. या पथकांसोबत ठेकेदारांचे कर्मचारी असतील. ही पथके नेमून दिलेल्या हद्दीत फिरून स्वतःहून खड्डे शोधून ते बुजवतील.

### ना नफा ना तोटा तत्त्वावर कामाचा दावा

» खड्डे मुक्त पुणे अभियान राबविताना महापालिकेच्या काही ठेकेदारांनी 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर काम करण्याची तयारी दर्शविली आहे. पथ विभागाने शहरातील सर्व मुख्य व आंतरिक रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

### खड्ड्यांपेक्षा ठिगळांचा जास्त धोका

» पुणे शहरातील रस्त्यांवर खड्डयांपेक्षा जास्त ठिकठिकाणी डांबराच्या ठिगळांचा (पॅचवर्क) धोका जास्त झालेला आहे. हे खड्डे बुजविण्यासाठी म्हणून डांबर व खडी टाकली जाते, त्यांची व्यवस्थित दबाई केली जात नसल्याने भर रस्त्यात उंचवटे निर्माण झाले आहेत. ते समपातळीत नसल्याने गाडी आदळत आहे. दुचाकीस्वारांना याचा प्रचंड त्रास होत असला तरी महापालिकेकडून ठिगळ लावताना काळजी घेतली जात नाही.

# जुन्नर व शिरूर परिसरातील बिबट्यांचे तातडीने स्थलांतर

## वनमंत्री गणेश नाईक वन्य प्राण्यांचे हल्ले रोखण्यासाठी महत्वाचे निर्णय; शेती व गोठ्यांना सौर कुंपण करणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, राजगुरूनगर व शिरुर परिसरातील बिबट्यांमुळे मनुष्यहानी होणे ही दुर्दैवी घटना आहे. यावर दीर्घ व तातडीच्या उपाययोजना करण्यात येतील. या परिसरातील बिबट्यांना पकडण्यासाठी 200 पिंजरे तातडीने लावण्यात येतील. आणखी एक हजार पिंजरे युद्धपातळीवर खरेदी करण्यात येणार आहेत. या परिसरातील बिबट्यांना पकडून त्यांचे तातडीने स्थलांतर करण्यात येईल. तसेच बिबट्यांची माहिती नागरिकांना व्हावी, यासाठी सॅटेलाईट आधारित कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून 'अर्लट' देण्यात येईल, अशी माहिती राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, राजगुरूनगर व शिरुर परिसरातील बिबट्यांच्या मानवावरील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज वनमंत्री श्री. नाईक यांनी मंत्रालयात बैठक घेऊन तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. यावेळी माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, प्रवक्ते वसंतराव जाधव, जिल्हा परिषद सदस्या आशा बुचके, जनता दलाचे प्रदेश अध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी तसेच वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल) एम. श्रीनिवास राव, मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर, पुण्याचे वनसंरक्षक आशिष ठाकरे आदी उपस्थित होते. पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी व जिल्हा पोलीस प्रमुख संदीप सिंग गिल हे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



वनमंत्री श्री. नाईक म्हणाले की, जुन्नर, आंबेगाव, राजगुरूनगर व शिरुर परिसरात बिबट्यांची संख्या वाढली आहे. त्यांना प्रतिबंध घालण्यासाठी व हल्ल्याच्या घटना घडू नयेत, यासाठी दीर्घ व अल्पकालीन उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील. युद्धपातळीवर या परिसरात वन विभागांच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात येईल. केंद्र शासनाच्या परवानगीने या परिसरातील बिबट्यांना पकडून त्यांचे स्थलांतर वनतारा, इतर राज्यात किंवा ज्यांना अधिकार आहे अशा ठिकाणी ज्या ठिकाणी सोय उपलब्ध आहे, तेथे पाठविण्यात येतील. वनाशेजारील शेतीला व गोठ्यांना विद्युत तारांचे कुंपण लावणे, एआयच्या माध्यमातून बिबट्यांची हालचालीची माहिती नागरिकांना कळविणे, शेतीला दिवसा पूर्ण ताकदीने वीज पुरवठा करणे आदी उपाययोजना करण्याच्या सूचना आज देण्यात आल्या आहेत. तसेच या परिसरातील बिबट्यांना पकडण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून तातडीने 200 पिंजरे खरेदी करण्यात येतील. त्याशिवाय वन विभागाच्या निधीतून आणखी 1 हजार पिंजरे तातडीने खरेदीसाठी 10 कोटींचा निधी देण्याचे निर्देश देण्यात आले असून आहेत.

वन विभागाला लागणारी वाहने, पिंजरे व इतर साहित्य तातडीने पुरविण्याचे व त्यासाठी लागणारा निधी देण्याचे निर्देश श्री. नाईक यांनी यावेळी दिले. नागरिकांच्या जिवीताचा प्रश्न असल्याने यासाठी कुठल्याही प्रकारे निधीची कमतरता पडू न देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

या परिसरातील बिबट्यांची वाढती संख्या रोखण्यासाठी नसबंदीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता मिळण्यासाठी सर्वपक्षीय नेते व वन अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ केंद्रीय वन मंत्री यांच्या भेटीसाठी घेऊन जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

गेल्या काही दिवसात या परिसरात बिबट्यांच्या हल्ल्यात चार जणांचा मृत्यू झाला आहे. ही दुर्दैवी घटना आहे. कालच्या घटनेनंतर वन विभागाने तातडीने बिबट्याला जेरबंद करण्यात आले आहे. या बिबट्याचे तातडीने स्थलांतर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लवकरच या घटनास्थळी भेट देऊन लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करण्यात येईल, अशी माहितीही श्री. नाईक यांनी यावेळी दिली.

# हडपसर ते लोणी काळभोर, हडपसर बस डेपो ते सासवड रोड या उपमार्गिकांना शासनाची मान्यता

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठपुराव्याला यश; मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता

**पुणे | प्रतिनीधी**

पुणे मेट्रो टप्पा- 2 खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी मेट्रो मार्गिकेअंतर्गत हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या दोन मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीस आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. या निर्णयामुळे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या दोन उपमार्गिका एकूण 16 किलोमीटर लांबीच्या असून त्यामध्ये एकूण 14 उन्नत स्थानकांचा समावेश असेल. या दोन्ही उपमार्गिकांसाठी 5 हजार 704 कोटी रुपये खर्च येणार असून या पूर्णतः उन्नत मेट्रो प्रकल्पांची महा मेट्रोमार्फत अंमलबजावणी करण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या दोन्ही प्रकल्पांमुळे पुणे शहरातील वाहतूक कोंडीपासून नागरिकांना दिलासा मिळेल. तसेच पुणे मेट्रोचे जाळे पूर्वेकडे विस्तारित होणार असून पूर्व पुणे आणि परिसरातील ग्रामीण भागालाही मेट्रो सेवेचा लाभ मिळेल. लाखो प्रवाशांना जलद आणि सुरक्षित वाहतुकीची सुविधा



उपलब्ध होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी व्यक्त केला आहे.

पुणे मेट्रो टप्पा-2 अंतर्गत होणाऱ्या या दोन उपमार्गिकांमुळे हडपसर, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि सासवडसारख्या वाढत्या उपनगरांना मेट्रो जोडणी मिळेल. या मेट्रोमुळे प्रवासाचा वेळ वाचेल आणि प्रदुषण कमी होण्यास मदत होईल, अशी माहितीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.